भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

# भारताचा आकस्मिकता निधी अधिनियम, १९५०

**( १९५० चा अधिनियम क्रमांक ४९ )**

[ १० जून २०१६ रोजी यथाविद्यमान ]

# The Contingency Fund of India Act, 1950

**(Act No. 49 of 1950)**

*[ As in force on the 10th June 2016 ]*

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

**२०१६**

[ **किंमत** : रुपये २० ]

# प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १० जून २०१६ रोजी यथाविद्यमान असलेला दि कण्टिन्जन्सि फंड इंडिया ॲक्ट, १९५० याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १७, अंक २, दिनांक २२ सप्टेंबर २०१६ यात पृष्ठ क्र. १२ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता.

हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतीच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली, **डॉ. जी. नारायण राजू,**

दिनांक २२ सप्टेंबर २०१६. सचिव, भारत सरकार.

# PREFACE

This edition of the Contingency Fund of India Act, 1950 as on the 10th June 2016, contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India,* Extraordinary, Part XII, Section 1, Vol. 17, No. 2, dated 22nd September 2016 on page No. 12.

This authoritative text was published under the authority of the President under Section-2, clause (a) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi, DR. G. NARAYAN RAJU,

Dated : 22nd September 2016. Secretary to the Government of India.

(शा.म.मु.) एच ४०१५ (१०६८–१२–२०१६)

# भारताचा आकस्मिकता निधी अधिनियम, १९५०

## कलमांचा क्रम

**कलमे**

१. संक्षिप्त नाव.

२. भारताचा आकस्मिकता निधी स्थापन करणे.

३. आकस्मिकता निधीची अभिरक्षा आणि त्यामधून रकमा काढणे.

४. नियम करण्याचा अधिकार.

# भारताचा आकस्मिकता निधी अधिनियम, १९५०

(१९५० चा अधिनियम क्रमांक ४९)[१]

[१० जून २०१६ रोजी यथाविद्यमान]

[१४ ऑगस्ट, १९५०]

**आकस्मिकता निधी स्थापन करण्यासाठी व त्याचे परिरक्षण करण्यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

संसदेद्वारे, तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**१.** या अधिनियमास भारताचा आकस्मिकता निधी अधिनियम, १९५० असे म्हणावे. **संक्षिप्त नाव.**

**२.** [२][(१)] भारताचा आकस्मिकता निधी या नावाचा अग्रधनाच्या स्वरूपातील एक आकस्मिकता निधी स्थापन करण्यात येईल. या निधीत भारताच्या एकत्रित निधीमधून आणि निधीपैकी [३][रुपये पन्नास कोटी] इतकी रक्कम प्रदान करण्यात येईल : **भारताचा आकस्मिकता निधी स्थापन करणे.**

[४][परंतु असे की, २८ जुलै, १९९९ पासून सुरू होणाऱ्या व ३१ मार्च, २००० रोजी संपणाऱ्या कालावधीमध्ये, हे कलम " रुपये पन्नास कोटी " या शब्दांऐवजी " रुपये पाचशे पन्नास कोटी " अशा फेरबदलाच्या अधीन राहून लागू होईल.]

[५]* * * * *

[६][(२) वित्त विधेयक, २००५ ला ज्या दिनांकाला व ज्या दिनांकापासून राष्ट्रपतीची अनुमती मिळेल त्या दिनांकाला व त्या दिनांकापासून पोट-कलम (१) अन्वये भारताच्या एकत्रीकृत निधीतून किंवा निधीमधून भारताच्या आकस्मिकता निधीमध्ये प्रदान करावयाची रक्कम पाचशे कोटी रुपयांपर्यंत वाढविता येईल.]

**३.** भारताचा आकस्मिकता निधी, राष्ट्रपतीच्या वतीने, वित्त मंत्रालयामधील भारत सरकारच्या सचिवाकडून धारण करण्यात येईल आणि अशा निधीमधून, अनपेक्षित खर्च भागविण्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त, विधिद्वारे करण्यात आलेल्या विनियोजनांअन्वये, अशा खर्चाला संसदेची अधिकृत मंजुरी मिळेपर्यंत, कोणत्याही आगाऊ रकमा काढण्यात येणार नाहीत. **आकस्मिकता निधीची अभिरक्षा आणि त्यामधून रकमा काढणे.**

**४.** [७][(१)] केंद्र सरकारला, या अधिनियमातील उद्दिष्टांची प्रयोजने पार पाडण्यासाठी [८][**राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे] भारताच्या आकस्मिकता निधीची अभिरक्षा, त्यामध्ये रक्कम भरणे आणि त्या निधीमधून रक्कम काढणे या संबंधात असलेले किंवा त्यास साहाय्यभूत ठरणारे सर्व बाबींचे विनियमन करणारे नियम करता येतील. **नियम करण्याचा अधिकार.**

[९][(२) या अधिनियमाअन्वये केलेला प्रत्येक नियम तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते सत्रासीन असताना, एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

---

१. हा अधिनियम, १९६२ चा अधिनियम क्रमांक १२ च्या कलम ३ व अनुसूचीद्वारे गोवा, दमण व दीव १९६३ चा अधिनियम क्रमांक ६ च्या कलम २ व अनुसूची एक द्वारे दादरा व नगर हवेली आणि १९६३ चा अधिनियम क्रमांक ७ च्या कलम ३ व अनुसूची एक द्वारे पाँडेचरीसाठी लागू करण्यात आला आहे.

२. सन २००५ चा अधिनियम क्रमांक १८, कलम ११५ द्वारे कलम २ ला पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

३. सन १९७६ चा अधिनियम क्रमांक ८१, कलम २ द्वारे " तीस कोटी रुपये " या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

४. सन १९९९ चा अधिनियम क्रमांक २९, कलम २ द्वारे दोन परंतुकांऐवजी एकच परंतुक, त्यात बदल करून ठेवले.

५. सन १९७२ चा अधिनियम क्रमांक १०, कलम २ द्वारे पूर्वी समाविष्ट करण्यात आलेले परंतुक सन १९७६ चा अधिनियम क्रमांक ८१ याच्या कलम २ द्वारे वगळण्यात आले (दि.९ फेब्रुवारी १९७२ रोजी व तेव्हापासून).

६. सन २००५ चा अधिनियम क्रमांक १८, कलम ११५ द्वारे हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

७. सन १९८२ चा अधिनियम क्रमांक ५१ द्वारे कलम ४ ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

८. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

९. भारताचे आकस्मिकता निधीबाबतच्या नियमासाठी जी.एस.आर.ओ. खंड सहा, इंग्रजी पृष्ठ ३३३ पहा.

# The Contingency Fund of India Act, 1950

## भारताचा आकस्मिकता निधी, १९५०

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| advance | आगाऊ रक्कम | [S. 3] |
| ancillary | साहाय्यभूत | [S. 4] |
| assent | अनुमती | [S. 2 (2)] |
| contingency fund | आकस्मिकता निधी | [Title] |
| custody | अभिरक्षा | [S. 4] |
| imprest | अग्रधन | [S. 2(1)] |
| modification | फेरबदल | [S. 2(1) (proviso)] |
| pending authorization | अधिकृत मंजुरी मिळेपर्यंत | [S. 3] |

# भारताचा आकस्मिकता निधी, १९५०

# The Contingency Fund of India Act, 1950

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अग्रधन | imprest | [क. २(१)] |
| अधिकृत मंजुरी मिळेपर्यंत | pending authorization | [क. ३] |
| अनुमती | assent | [क. २(२)] |
| अभिरक्षा | custody | [क. ४] |
| आकस्मिकता निधी | contingency fund | [शीर्षक] |
| आगाऊ रक्कम | advance | [क. ३] |
| फेरबदल | modification | [क. २(१) परंतुक] |
| साहाय्यभूत | ancillary | [क. ४] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई